23

# MAHARASHTRA ACT No. V OF 1968.

## AN ACT TO MAKE PROVISION FOR PLACING THE QUEEN VICTORIA STATUE SITE AT BOMBAY AND CERTAIN LAND ADJACENT THERETO AT THE DISPOSAL OF THE GOVERNMENT OF INDIA FOR SETTING UP OF SATELLITE TELECOMMUNICATIONS EXCHANGES OF THE OVERSEAS COMMUNICATIONS SERVICE AND FOR THAT PURPOSE TO AMEND THE BOMBAY MUNICIPAL CORPORATION ACT AND TO TAKE POWER TO MAKE CERTAIN CHANGES IN THE DEVELOPMENT PLAN, DEVELOPMENT CONTROL RULES AND BUILDING REGULATIONS, ETC.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक १९ मार्च १९६८ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला].

## सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५

**मुंबई येथील महाराणी व्हिक्टोरियाच्या पुतळ्याची जागा आणि त्या लगतची विवक्षित जमीन, समुद्रपार दळणवळण सेवेची उपग्रह दूरसंचार केंद्रे उभारण्यासाठी म्हणून भारत सरकारकडे देण्याकरिता आणि त्या प्रयोजनासाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियमात सुधारणा करण्याकरिता आणि विकास योजना, विकास नियंत्रण नियम आणि इमारतविषयक विनियम इत्यादींमध्ये विवक्षित बदल करण्याची शक्ती घेण्याकरिता अधिनियम.**

ज्याअर्थी, मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ८९-ब अन्वये, मुंबई येथील एस्प्लनेड रस्त्यावरील महाराणी व्हिक्टोरिया हिचा पुतळा आणि त्याची जागा यातील सरकारची सर्व संपत्ति व त्यावरील सरकारचे सर्व अधिकार, हक्क व हितसंबंध हे महानगरपालिकेकडे निहित करण्यात आले होते आणि, उक्त पुतळा आणि उक्त जागा ही त्यानंतर महानगरपालिका सार्वजनिक स्मारक-शिल्प म्हणून, विश्वस्त व्यवस्थेच्या स्वरूपात, धारण करील अशी तरतूद करण्यात आली होती ;

आणि ज्याअर्थी, (विदेशी सार्वभौम राजे व प्रशासक यांच्या इतर पुतळ्यासमवेत) उक्त पुतळा उक्त जागेवरून १२ ऑगस्ट १९६५ रोजी काढून टाकण्यात आला आहे ;

आणि ज्याअर्थी, ज्या प्रयोजनार्थ जागा निहित करण्यात आलेली होती आणि विश्वस्त व्यवस्था निर्माण करण्यात आली होती ते प्रयोजन आता अस्तित्वात नाही ;

आणि ज्याअर्थी, उक्त विश्वस्थ व्यवस्था रद्द व नष्ट करणे आणि त्या कारणाकरिता महानगर-पालिकेकडे निहित केलेली उक्त जागा, महानगरपालिकेकडून, काढून घेणे आणि ती पुन्हा राज्य सरकारकडे निहित करणे इष्ट आहे ;

आणि ज्याअर्थी, आंतरराष्ट्रीय सार्वजनिक दळणवळणासाठी म्हणून, जागतिक दळणवळण उपग्रह यंत्रणा उभारण्यासंबंधीच्या करारावर ज्या ६० राष्ट्रांनी सह्या केल्या आहेत ती सर्व राष्ट्रे मिळून बनलेल्या (भारत पण एक सदस्य असलेल्या) आंतरराष्ट्रीय दूरसंचार उपग्रह संघाकडून (इन्टलसॅट) उभारण्यात येत असलेल्या जागतिक उपग्रह दळणवळणाच्या यंत्रणेत सहभागी होण्यासाठी समुद्रपार दळणवळण सेवेच्या उपग्रह दूरसंचार केंद्राची उभारणी करण्यासाठी उक्त जागा आणि तिच्या लगतची विवक्षित जमीन ताबडतोब मिळणे आवश्यक आहे ;

आणि त्याअर्थी, उक्त जागा आणि तिच्या लगतची जमीन ही, मिळालेले संदेश आणि माहिती जेथून सर्व भारतात प्रसारित करण्यात येईल अशा वॉडबी रस्त्यावरील केंद्रापासून आवश्यक तेवढ्या अंतरावर असल्यामुळे, उक्त केंद्रासाठी अतिशय योग्य जागा आहे ;

आणि ज्याअर्थी, केंद्राचे बांधकाम तात्काळ सुरू व्हावे म्हणून उपरोक्त प्रयोजनार्थ उपरोक्त राणीच्या पुतळ्याची उक्त जागा व तिच्या लगतची विवक्षित जमीन भारत सरकारच्या दळणवळण मंत्रालयाकडे सुपूर्द करण्याकरिता ताबडतोब तरतूद करणे आणि तसेच उपरोक्त केंद्राचे तदनंतर

त्वरेने बांधकाम करणे व त्याचे काम कार्यक्षमरीत्या चालणे शक्य व्हावे म्हणून (बृहन्मुंबईची विकास योजना, विकास नियंत्रण नियम, महानगरपालिका इमारतीविषयक विनियम यात आणि तत्संबंधित बाबींमध्ये जे कोणतेही फेरबदल आवश्यक असतील ते फेरबदल धरून), आनुषंगिक व पूरक तरतुदी करणे आवश्यक आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, मुंबईच्या महाराणी व्हिक्टोरियाच्या पुतळ्याच्या जागेचा (आणि तिच्या लगतच्या जमिनीचा समुद्रपार दळणवळण सेवेच्या, उपग्रह दूरसंचार केंद्राची रचना करण्यासाठी वापर करण्याबाबत) अधिनियम, १९६८, असे म्हणता येईल.

(२) तो, दिनांक १२ जानेवारी १९६८ रोजी अंमलात आल्याचे मानण्यात येईल.

मुंबई येथील महाराणी व्हिक्टोरियाच्या पुतळ्याची जागा व त्यालगत असलेली जमीन शासनाकडे निहित करणे आणि महानगरपालिकेस भरपाई देणे.

२. (१) बृहन्मुंबईच्या महानगरपालिकेकडे निहित असलेला व तिने विश्वस्त व्यवस्थेच्या स्वरूपात सार्वजनिक स्मारक शिल्प म्हणून धारण केलेला महाराणी व्हिक्टोरियाचा पुतळा हलविण्यात आल्यामुळे व उक्त जागा, विश्वस्त व्यवस्थेच्या प्रयोजनासाठी यापुढे आवश्यक नसल्यामुळे, उपरोक्त विश्वस्त व्यवस्था, रद्द व नष्ट करण्यात येईल व ती याद्वारे रद्द व नष्ट करण्यात आली आहे ; आणि उक्त जागेतील, महानगरपालिकेची सर्व संपत्ति व तीवरील तिचे अधिकार, हक्क व हितसंबंध, महानगरपालिकेकडून काढून घेण्यात येतील व ते याद्वारे काढून घेण्यात आले आहेत आणि, ती, याद्वारे, आणखी कोणत्याही हमीशिवाय तीवर परिणाम करणारे कोणत्याही प्रकारचे सर्व अधिकार व दायित्वे आणि भार यापासून मुक्त, राज्य शासनाकडे, याद्वारे पुन: निहित करण्यात येत आहे ; आणि राज्य शासन, उक्त जागेचा ताबडतोब ताबा घेईल. उक्त विश्वस्त व्यवस्था रद्द व नष्ट केल्याच्या परिणामी, मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे कलम ८९-ब गाळण्यात येईल ; आणि उक्त अधिनियमाच्या कलम ९२ च्या परंतुकातील "हर मॅजेस्टी क्विन व्हिक्टोरिया यांचा पुतळा किंवा" हा मजकूर वगळण्यात येईल आणि "कलम ८९-ब आणि" हा मजकूर वगळण्यात येईल आणि "त्यांच्या जागेस" या मजकुराऐवजी "त्याच्या जागेस" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(२) अनुसूचीत अधिक तपशील देऊन वर्णन केलेल्या, उपरोक्त पुतळ्याच्या जागेस लागून असलेली जागा, महानगरपालिकेकडून काढून घेण्यात येईल, आणि ती, याद्वारे, काढून घेण्यात आली आहे आणि ती, याद्वारे, आणखी कोणत्याही हमीशिवाय, तीवर परिणाम करणारे—मग ते व्यक्तीचे किंवा महानगरपालिकेचे किंवा जनतेचे असोत—सर्व अधिकार, दायित्वे व भार यापासून मुक्त, राज्य शासनाकडे निहित करण्यात येत आहे. राज्य शासन उक्त जागेचा ताबा ताबडतोब घेईल.

(३) अशा रीतीने राज्य शासनाकडे पुन: निहित केलेली किंवा निहित केलेली जागा व जमीन याबद्दल, महानगरपालिकेबरोबर करार करण्यात येईल त्याप्रमाणे आणि असा करार न झाल्यास, राज्य शासनाकडून नेमण्यात येईल अशा इसमाकडून निश्चित करण्यात येईल अशी भरपाई शासनाकडून देण्यात येईल ; असा नेमण्यात आलेला इसम, भूमिसंपादन अधिनियम, १८९४ या भरपाई ठरविण्यासाठी घालून दिलेल्या तत्वानुसार उक्त भरपाई निश्चित करील आणि (न्यायालयाकडे निर्देश करणे व अपिलासंबंधी असलेले उपबंध धरून) उक्त अधिनियमाचे उपबंध हे, उक्त अधिनियमाच्या उपबंधान्वये उक्त जागा व जमीन संपादन करण्यात आली असून त्याबद्दल भरपाई निश्चित करावयाची असल्याप्रमाणे, योग्य त्या फेरफारासह, उक्त बाबीस लागू होतील.

भारत सरकारकडून उभारण्यात येणाऱ्या समुद्रपार दळणवळण सेवेच्या

३. मुंबई महानगरपालिका अधिनियम किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (उक्त अधिनियमान्वये करण्यात किंवा मंजूर करण्यात आलेले कोणतेही इमारतविषयक नियम, विकास नियंत्रण नियम किंवा विकास योजना धरून) यात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीमध्ये, काहीही असले तरी, राज्य शासनास, समुद्रपार दळणवळण सेवेची उपग्रह दूरसंचार केंद्र उभारण्याकरिता म्हणून उपरोक्त जागेचा आणि त्या लगतच्या जमिनीचा वापर करण्यास परवानगी देता येईल आणि त्या प्रयोजनार्थ राज्य शासनास, त्यास योग्य वाटतील अशा अटींवर व शर्तींवर आणि असे निर्बंध लादून, उक्त जागा व त्यालगतची जमीन, भारत

सरकारकडे हस्तांतरित करता येईल आणि राज्य शासनास, बृहन्मुंबईसाठीच्या विकास योजनेत तरतूद करण्यात आलेल्या कोणत्याही आरक्षणातून कोणतीही जमीन काढून घेण्याची आणि फरसबंदी क्षेत्र निर्देशांकासंबंधीचे कोणतेही निर्बंध शिथिल करण्याची किंवा इतर कोणतेही फरसबंदी क्षेत्र निर्देशांक निश्चित करण्याची किंवा उक्त केंद्राचे बांधकाम योग्य प्रकारे व कार्यक्षमरीत्या करता यावे म्हणून त्याबद्दलची गरज विचारात घेऊन, इमारतविषयक व विकास नियंत्रण नियम व विनियम यासंबंधातील आणि त्याच्याशी संबंधित असलेल्या गोष्टींबाबतच्या इतर कोणत्याही शर्ती व अटी आणि निर्बंध काढून टाकण्याची किंवा त्या शिथिल करण्याची, शक्ती असेल.

दळणवळण सेवेच्या उपग्रह दूरसंचार केंद्राकरिता राज्य शासनाकडे निहित असलेल्या जागेचा आणि जमिनीचा वापर आणि केंद्राचे बांधकाम करणे शक्य व्हावे म्हणून विकास योजना, विकास नियंत्रण नियम, इमारत-विषयक विनियम, इत्यादींतील बदल.

४. (१) मुंबईच्या महाराणी व्हिक्टोरियाच्या पुतळ्याच्या जागेचा (आणि तिच्या लगतच्या जमिनीचा समुद्रपार दळणवळण सेवेच्या, उपग्रह दूरसंचार केंद्राची रचना करण्यासाठी वापर करण्याबाबत) अध्यादेश, १९६८, हा, याद्वारे, रद्द करण्यात येत आहे.

(२) (अध्यादेश) अशा रीतीने रद्द करण्यात आला असला तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कृती ही, या अधिनियमान्वये करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

सन १९६८चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ रद्द करणे आणि व्यावृत्ति.

## अनुसूची


### कलम २ अन्वये राज्य सरकारकडे निहित केलेल्या महाराणी व्हिक्टोरियाच्या पुतळ्याची जागा आणि त्या लगतची जमीन यांचे वर्णन व नकाशा.

### वर्णन

(अ) १०१३ चौरस यार्ड म्हणजेच ८४७ चौरस मीटर इतकी किंवा थोडी कमी जास्त असलेली आणि फोर्ट विभागाचा भूकर पाहणी क्रमांक ७३३ (Cadestral Survey No. 733) असलेली आणि पुढीलप्रमाणे चतु:सीमा म्हणजेच दक्षिणेस किंवा दक्षिणेकडे सार्वजनिक सडक आणि त्यापलीकडे भूकर पाहणी क्रमांक ७०८ (C. S. No. 708) असलेली केंद्रीय तार कार्यालयाची मालमत्ता, पश्चिमेस किंवा पश्चिमेकडे मेयो मार्ग, पूर्वेस किंवा पूर्वेकडे महात्मा गांधी मार्ग (एस्प्लनेड मार्ग म्हणून पूर्वी ओळखण्यात येणारा) आणि उत्तरेस किंवा उत्तरेकडे, मार्ग संयोग (रोड जंक्शन) असलेली महाराणी व्हिक्टोरियाच्या पुतळ्याची जागा समाविष्ट असलेली सर्व जमीन, वरील जमिनीच्या हद्दी खालील नकाशात, लाल रंगाने दर्शविण्यात आल्या आहेत.

(ब) ३९१ चौरस यार्ड म्हणजेच ३२७ चौरस मीटर इतका किंवा थोडा कमी जास्त असलेला, पुढील-प्रमाणे-चतुःसीमा म्हणजेच दक्षिणेस किंवा दक्षिणेकडे भूकर पाहणी क्रमांक ७०८ (C. S. No. 708), पश्चिमेस किंवा पश्चिमेकडे मेयो मार्ग, पूर्वेस किंवा पूर्वेकडे महात्मा गांधी मार्ग (पूर्वी एस्प्लनेड मार्ग म्हणून ओळखण्यात येणारा) आणि उत्तरेस किंवा उत्तरेकडे भूकर पाहणी क्रमांक ७३३ आहे असा भूकर पाहणी क्रमांक ७३३ (C. S. No. 733) ला लागून असलेल्या सार्वजनिक रस्त्याचा, त्याच्या दक्षिणेकडील भाग. वरील जमिनीच्या, पश्चिम, दक्षिण व पूर्व दिशेकडील हद्दी, खालील नकाशात, निळचा रंगात आणि तिच्या उत्तरेकडील हद्द लाल रंगात दर्शविण्यात आली आहे.

नकाशा




(यथार्थ अनुवाद)

**बा. ना. पंडित,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.